REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# दलित साहित्य आणि समाज : एक चिंतन


**जाधव ए. जे.**
सहयोगी प्राध्यापक , मराठी विभाग प्रमुख , श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा.

समाजातील कोणतीही चळवळ समाजाच्या सर्व क्षेत्रांवर बरा - वाईट व कमी अधिक परिणाम करीत असते. साहित्याचे क्षेत्र हे त्यापेक्षा वेगळे नाही. चळवळ आणि साहित्य निर्मिती हयांचा संबंध कोणत्या ना कोणत्या स्वरूपात असतोच. त्या साहित्याचा संबंध मानवी समाजाशी असतो. मानवी समाजाशी खूप अतूट नाते असते. या निबंधात मानवी समाज आणि दलित साहित्य याचे सामाजिक स्वरूप तपासण्याचा प्रयत्न करणार आहे. किंबहु नादलित साहित्यातील समाजदर्शन शोधण्याचा प्रयत्न करणार आहे. ते खालील घटकांच्या आधारे

१. दलित साहित्य आणि चळवळ
२. दलित कवितेतील समाजदर्शन
३. दलित आत्मकथनातील समाजदर्शन
४. दलित साहित्याची भाषाशैली

## १. दलित साहित्य आणि चळवळ : -

जगामध्ये मधून - मधून वैचारिक भूकंप होत असतात. हे भूकंप का होतात याची कारणमीमांसा करताना दलित साहित्य चळवळीकडे पाहावे लागते. बाबासाहेबांनी चळवळीला सुरूवात १९२० साली केली. या काळात चळवळ एकत्र करणे हेच त्यांच्यापुढचे ध्येय होते. त्यातून चळवळ वाढविण्याचे काम ते करत होते. पट्टे बापूराव सारखा माणूस त्या काळामध्ये बाबासाहेबांच्या चळवळीचे वर्णन कवितेतून करताना म्हणतो. सप्तकोटीला रंग आला नवा, दिले शिक्षण मोत्याचा गिलावा आता बरी सुटली हवा". पट्टे बापूरावांनी हे वर्णन केले आहे. या संदर्भात रतनलाल सोनाग्रा म्हणतात. भीमकविता निर्माण झाली कुणाच्या तलवारीचे पाते लेखणी झाले. कुणाच्या आसवांनी शाई केली. कुणाच्या रावी ने



लेखणीचे रूप घेतले"१. कोणताही प्रवाह उगीचच निर्माण होत नाही किंवा उगम पावत. त्यांच्या निर्मितीमागे हेतू असतो. मानवी व्यवहाराचे, मानवी व्यवहाराशी अतूट नाते असते. साहित्यसृष्टी समाजासाठी असते. त्यामध्ये बदलते जीवनचित्रण आपोआप येत असते. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक घडामोडी या वाड.्मयात आपोआपच येत असतात. एखादा वाड्.मय प्रकार उगम पावल्यानंतर अनेक अडीअडचणीतून मार्ग काढतो. उगमाच्या ठिकाणी तो लहान व

नंतर आपोआपच मोठा होत जातो. दलित साहित्य हे चळवळीतून जन्माला आलेले साहित्य आहे. चळवळीचे कार्यकर्ते हे लेखक होते. लेखक हे चळवळीचे कार्यकर्ते होते. त्यामुळे त्या साहित्याचा संबंध समाजाशी आपोआपच येत गेला. या साहित्यातून मानवी हक्क मागितले आहे. आणि या साहित्यनिर्मितीचा महत्वाचा हेतू मानवी हक्कच आहे. भारतीय समाज व्यवस्था ही चातुर्वर्ण्य प्रधान होती. त्यामुळे सर्वात खालच्या वर्गाला आतोनात हाल सहन करावे लागले. यातून निर्माण झालेली प्रतिक्रिया म्हणजे दलित चळवळ होय. गुलामीतुन मुक्तता व्हावी हा हया चळवळीचा महत्वाचा हेतू होता. यातून ही चळवळ स्वातंत्र, समता, बंधुता आणि न्याय या चार सुत्रांचा अंगिकार करू लागली. बाबासाहेब आंबेडकरांसारखा महानायक या चळवळीला मिळाला यातून बाबासाहेबांनी चवदार तळयाचा सत्याग्रह, काळा मंदिराचा सत्याग्रह, धर्मांतराची चळवळ आणि धर्मांतर अस्पृश्य समाजाला मानवी हक्क देण्यासाठी जे करता येईल ते करण्याचा प्रयत्न केला. यातून दलित समाज शिकू लागला. ज्ञान ग्रहण करू लागला. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे माध्यम झाले. यातून दलित समाजात अमूलाग्र बदल होवू लागला. स्वत्वाची जाणीव होऊ लागली. आणि आजपर्यंत मुक असलेला नायक डॉ. बाबासाहेबांच्या आशिर्वादाने बोलू लागला, लिहू लागला. या संदर्भात महाविर जोंधळे म्हणतात, साहित्य ही आभाळातून उतरणारी गोष्ट नाही. साहित्याचा उगम जीवनातूनच होत असतो. जीवनाला वगळून साहित्याचा विचार करता येत नसतो. म्हणून जसे जीवन तसे साहित्य''२. दलित साहित्य चळवळीच्या बाबतीत महावीर जोंधळेंचे म्हणणे पटण्यासारखे आहे. साहित्याचा उगम जीवनातून होत असतो. जीवनाला वगळून साहित्याचा विचार करता येत नाही. याला दलित साहित्य अपवाद नाही. १९६० नंतर जे दलित साहित्य आहे लेखकांची पिढी निर्माण झाली सामान्य माणसाचा जीवनस्तर रेखाटण्याचा प्रयत्न या चळवळीने केला. जातीविरहीत समाजव्यवस्था कशी निर्माण करता येईल याविषयी ही चळवळ पुढे जाताना दिसते आहे. आजच्या साहित्याबद्दल विचार करताना सुध्दा आधीच्या साहित्याकडे डोळेझाक करून चालणार नाही. शिवाय आजचे साहित्य हे कालच्या साहित्यावर, कालच साहित्य हे परवाच्या साहित्यावर उभ असते. आज जे दलित साहित्य म्हणून ओळखले जाते. डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीवर उभा आहे. म्हणून दलित साहित्याचे संदर्भ शोधत असताना दलित साहित्य हे दिनदुबळया, गरिब, शेतकरी, शेतमजूर, दलित खेडयातील अनपढ माणसाचे व त्या समाजाचे साहित्य आहे.

## २. दलित कवितेतील समाजदर्शन : -

दलित कविता किंवा काव्य किंवा गाणे हे समाजामध्ये काहीतरी बिघडलेले आहे. याचा निर्देश करतो. यातून समाज दर्शन घडवण्याचा प्रयत्न करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असताना शहिर केरूजी घोंगडे हयांनी महाराच पोर बेटया लई हुशार' हे गीत बाबासाहेबांच्या समोर म्हणून दाखविले. बहुसंख्या भीमगीतकारांनी वरिष्ठ वर्गीयांचे दोष दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. भीमराव कर्डक म्हणतात, नाही समता तुमच्या अंगी तुम्ही लिहीली शास्त्रे ढोंगी' या दोन ओळीत पूर्ण समाज डोळयासमोर उभे करण्याचे सामर्थ्य आहे. समाजात समता नाही. हे दाखवून देतात. वामनदादा कर्डकांची गाणी ही दलित चळवळीबरोबरच ती वाढली. दलित चळवळीबरोबर तिचा विकास झाला. दलित चळवळीचे दोष दाखविण्याचे काम वामनदादांनी केले आहे. उदाहरणार्थ कोण कुणाचा गुरू न चेला, जो तो पुढारी झाला. मतभेदाने समाज ग्रासला, चळवळ खिचडी काला''. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गेल्यानंतर जी समाजाची स्थिती झाली आहे किती मार्मिक शब्दात केली आहे. दलितांचे साहित्य ब्राम्हणी साहित्यासारखे एकजातीय जाणीवा दाखवून सर्वव्यापीत टाळते. विशिष्ट व मर्यादित क्षेत्रापलिकडे जात नाही. साचेबंद ठराविक प्रतिसाद अपेक्षित करते. हया साचेबंदाला तोडणारी नवी वर्तुळे बागुल ढसाळ दया पवार यांनी आज निर्माण केली आहेत. परंतू हेही भान मराठी समिक्षेने ठेवले नाही''४. भालचंद्र नेमाडे यांनी दलित साहित्याच्या संदर्भात जे विधान केले आहे ते मत चिकित्सक आहे. ती चिकित्सा पटण्यासारखी आहे. दलित कविता ही विद्रोही कविता आहे. पारंपारीक संकेत धुडकावणारी आहे. या संदर्भात शरणकुमार लिबांळे म्हणतात ढसाळांच्या कविता शिष्टसंकेत धुडकावणाऱ्या आहेत. जे शब्द कवितेतच काय चारचौघात बोलताना देखील वापरले

जाणार नाहीत. ते ढसाळांच्या कवितेत सर्वत्र सर्रास आढळतील. ढसाळांची कविता बीमत्स आणि कठोर आहे. हा कवी शिल अश्लिलाचा विचार करताना दिसत नाही.

जिवाचे नाव लवडा ठेउन जगणाऱ्यांनी
खुशाल जगावे
मी तसा जगणार नाही"५

ढसाळांची कविता वाचकांना धक्के देणारी आहे. त्यांची दमछाक करणारी आहे. ढसाळ जाणूनबुजून कवितेला नवा चेहरा दिसतात. आक्रमकपणा त्यांच्या कवितेत दिसून येतो. माणसावर लादल्या गेलेल्या अमानवीय पाशवी अत्याचाराचे वर्णन त्यांच्या कवितेत करतात. ढसाळांच्या विद्रोहाला समाजविचाराची बैठक आहे. लोकशाहीत सामान्य माणसाला काहीही मिळाल नाही. म्हणून ते म्हणतात,

हाण रे सख्या तुझीच बारी
लोकशही मेली तर डेंगण्या मारी"६

नामदेव ढसाळांनी केलेले वर्णन लोकशहीच्या चाललेल्या थट्टेबद्दल आहे. ढसाळ हे दलित समाजाचे चांगले निरिक्षक होते. दलित चळवळीच्या कार्यकर्त्यांच्या भूमिकेत वावारताना दिसतात. दलित समाजावर होणारया अन्यायाच्या विरोधात ते सोडावाटरची बाटली होतात. शब्दांची मोडतोड करतात. यशवंत मनोहर आणि नामदेव ढसाळ यांना दलित समाजाची चांगली जाणीव होती. तीच जाणीव, तेच प्रश्न, ती बांधिलकी कवीतेतून व्यक्त होताना दिसते. यशवंत मनोहरांच्या  उत्थानगुंफा' हा काव्यसंग्रह या देशातील वरिष्ठ वर्गीयांना प्रश्न विचारतो.

माझ्या आयुष्याची भ्रणहत्या केली आहे हया भूमीने माझ्या बहिष्कृत स्फुरदांच्या अनादूत अक्षरांवर उठविल्या आहेत तिने संतप्त शपमुद्रा"७

जातिव्यवस्थेत चिरडल्या गेलेल्या समाजाचे हे ओरडणे आहे. लोकनाथ यशवंतांनी  आता होवून जाऊ द्या' या काव्यसंग्रहात जे दु:ख मांडले आहे,  जोहार करणारे आमचे  हात कापून फेकले आहे. आता शस्त्राशिवाय हातात काहीच नाही'. यातून संपूर्ण समाजव्यवस्थेचे दु:ख मांडले आहे.

नामदेव ढसाळ, लोकनाथ यशवंत, यशवंत मनोहर, दया पवार, केशव मेश्राम या सर्व कवींनी दलितांची व्यथा वेदना मांडली. इतकेच नसून दलित समाजाचे दु:ख, त्या दु:खातून त्यांची मुक्तता कशी होईल यासाठी उपाययोजना सांगितल्या, काही वेळेला त्या हातात तलवार घेतात, काही वेळेला समाजाशी दोन हात करण्याचा निर्धार करतात.

**३. दलित आत्मकथनातील समाजचिंतन : -**

दलित आत्मचरित्राची सुरूवात १९७८ साली  बलुतं' या आत्मकथनांनी झाली. या आत्मकथनात महानगरीय मुंबईचे चित्रण आले आहे. अस्पृश्य समाज, त्यांची जगण्याची रीत, जगण्यासाठी चाललेली धडपड यानंतर प्र.ई. सोनकांबळेंचे  आठवणींचे पक्षी' डोळया समोर येते. प्र.ई. सोनकांबळेंनी शिक्षण घेत असताना आलेल्या अडचणी, त्यातून काढावे लागणारे वेगवेगळे मार्ग त्या सर्वातून दलितांच्या समस्या पोटतिडकीने मांडल्या आहेत. त्या त्या समाजाची अंधश्रध्दा, दारिद्रय, भोगाव्या लागणा-या यातना, वर्षानुवर्षे पायदळी तुडविलेला समाज आत्मकथनामधून त्यांचे दु:ख मांडताना दिसत आहे.  उपरा',  उचल्या',  काटयावरची पोट' तीन वेगवेगळया जातीतील लेखकांचे हे आत्मचरित्र आहेत. हया लेखकांनी आपापल्या समाजातील जगण्यासाठी चाललेल्या यातनांचे चित्रण केले आहे.  आक्करमाशी' या

आत्मकथनाचे मराठी समाज ढवळून निघाला रोखठोक, वाटयाला आलेले दु:ख हे यामध्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे. जगण्याच्या पलिकडे जाऊन ज्या यातना भोगाव्या लागतात त्या यातनांचे चित्रण यात आले आहे. भीमराव गस्ती यांचे बेरड' हे आत्मकथन रामोशी जमातीच्या समस्या का वेशीवरती टांगल्या आहेत. वाट तुडवताना' हे उत्तम कांबळेंचे आत्मकथन सर्वार्थाने निराळे आहे. कार्यकर्ता आणि पत्रकार म्हणून उत्तम कांबळेची बाजू यामध्ये दिसून येते. उर्मिला पवारांचे आयदान हे आत्मकथन उच्चवर्णीय तथाकथीत समाजाचे बुरखे फाडणारे आहे. दलित समाजाचे आत्मकथन जागे करणारे आहे. आमचा बाप आणि आम्ही'' हे नरेंद्र जाधवांचे आत्मकथन सर्वार्थाने वेगळे असून ओसरता दलित समाज यात दिसून येतो. अमेरिकेत गेल्यावर तेथील समाज दिसतो. या दोन भौगोलिक घटनांची नोंद यात केली आहे. विविध क्षेत्रात नाव मिळविल्यानंतर आपल्या कुटूंबाची यशोगाथा ते रेखाटतात प्रत्येक महार घटकांनी मी कोण होतो आणि आता कोण आहे याची उकल करता करता त्याचे आत्मचरित्र संपूण जाते. किशोर शांताबाई काळे यांचे कोल्हाटयाचे पोर' हे आत्मकथन घरच्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करता, नाचणारींच्या पोटाला जन्माला आल्यानंतर काय यातना होतात. समाज कोणत्या दृष्टीने पाहतो. याचे चित्रण यात आले आहे. याच काळात बहु संख्यस्त्री आत्मकथन लिहिताना दिसतात. बेबी कांबळे, मलिका अमर शेख, शांताबाई कांबळे, कुमुद पावडे या स्त्रीयांशी दलित समाजातील दु:ख, यातना, वेदना पोटतिडकीने मांडल्या आहेत.

या सर्व आत्मकथनांनी मराठी वाचकाला एका सर्वस्वी नव्या अनुभवक्षेत्रात नेऊन सोडण्याचे काम केले आहे. माणूसकीचा प्रगल्भ प्रत्यय देण्याचा प्रयत्न केला आहे. जीवनाकडे गंभीर वृत्तीने पाहाण्यास लावले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला संदेश शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मूलमंत्र आपल्या आत्मकथनातून प्रत्येक आत्मकथनकरांनी देण्याचा प्रयत्न केला आहे.

## ४. दलित साहित्यातील भाषाशैली एक चिंतनः -

दलित साहित्याचा भाषिक व्यवहार तपासताना त्यातून दलित समाजाचा व्यवहार डोकावताना दिसून येतो. भाषेची मोडतोड करणे हे नामदेव ढसाळांच्या कवितेत दिसून येते. विद्रोही भाषा उदारणार्थ, शेठ सावकरांची आई झवून टाकावी, नात्या गोत्यांचा केसाने गळा कापावा, जेवणातून विष घालावी, मूठ मारावे, माणसाने कोणाच्याही आया बहिणीवर केव्हाही कोठेही चढावे, पोरीबाळींशी सहइंद्रिय चाळे करावे, म्हातारी म्हणू नये, तरणी म्हणूमये सर्वांना पासले पाडावे, तुमच्या पापाचे छिनाल घट फोडण्यासाठी ढसाळांची कविता ही अंगावर शहारे आणणारी आहे. भाषेची मोडतोड करणारी आहे. वर्षानुवर्षे जपून ठेवलेल्या भाषेला रस्त्यावर आणतात. त्या भाषेला स्वत:च्या इच्छेनुसार वागवतात. दलित आत्मचित्रकार बोलीभाषेचा वापर करतात. उदाहरणार्थ - माकरबिकर, कोरडयास, कापल सवरलं, बारकेसुरके, काडीबीडी, खीसेकापू, वाटसरू या सर्व आत्मकथनांमधून तत्कालीन बोलीभाषा डोळयासमोर येते. तर लक्षमण मानेचा मास्तर लक्ष्मण मानेला विचारतो, लेका बिनभिकारीला शाळा असते व्हय'' हा त्यांचा प्रश्न किती सोप्या शब्दात मानेंनी मांडला आहे. बा बिनचुकता अभ्यासाला बसवत होता'. हे मार खाण्याचं शिक्षण अगदी रानटीपणाचे आहे'. वग्री, टिंगर, सागुती, रक्ती असे कितीतरी शब्द दलित साहित्याने मराठी साहित्याला दिले आहेत. शब्दांचे नवे दालन समृध्द केलं आहे. भाषा समृध्द केली आहे.

## समारोप : -

दलित साहित्याचा प्रांजळपणा तपासताना समाजदर्शन आपोआपच होते. त्या समाजाचं दु:ख वेशीवरती टांगण्याच काम दलित चळवळीने केले. ही चळवळ तळागाळातून आली होती. खेडयातून शहरात गेलेला वर्ग होता. काहीतरी स्वप्न उराशी बाळगलेला वर्ग होता. या वर्गांनी दलित समाजातील अन्याय अत्याचाराला वाचा फोडली हे सर्व कार्यकर्ते होते. ते सर्व कार्येकर्ते लेखक होते. दलित लेखक त्यांच्या काळातल्या समस्येवरती भाष्य करत नाही. तर

**उपाययोजनाही सांगतो यासाठी भीमगीतकारांनी समाज प्रबोधन केले. उद्‌बोधन केले आणि समाजाला मार्ग दाखविण्याचा प्रयत्न केला.**

**संदर्भ: -**


1. **सोनाग्रा रतनलाल, आमची चळवळ आमची माणसं', आनंद प्रकाशन, औरंगाबाद, १९९८, पृ. ७**
2. **जोंधळे महावीर, साहित्य : आशय आणि आविष्कार, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती: मे २००२, पृ. ३१**
3. **शहाणे अशोक, नपेक्षा' लोकवाड्.मय गृह मुंबई, दुसरी आवृत्ती जानेवारी २००८, पृ. ३२**
4. **नेमाडे भालचंद्र, टीकास्वयंवर', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती: १९९४, पृ. १३४**
5. **लिबांळे शरणकुमार, साहित्याचे निकष बदलावे लागतील', दिलीपराव प्रकाशन, पुणे, व्दितीय आवृत्ती: २००७, पृ. १४**
6. **ढसाळ नामदेव, गोलपीठा' नीलकंठ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती: १९७२, पृ. ७१**
7. **मनोहर यशवंत, उत्थानगुंफा', कॉण्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती: १९७७, पृ. ४**